दैनिक महा मेट्रो
www.mahametronews.in
वर्ष ४ थे : अंक : २ पुणे, मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५
पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.04. ISSUE : 2 Pune, Tuesday, 18 August 2025
Pages : 4 PRICE : 3.00

# विमानतळावरील ऐरोमॉलच्या वाहनतळावर दररोज वीस ते पंचवीस हजार वाहनांची ये जा

## रस्त्यांवर अनाधिकृत थांबणाऱ्या ६ हजार वाहनांवर कारवाई ; ४० लाख दंड वसुल

**पूणे । प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळा काही महिन्यापूर्वी ऐरोमॉल उद्घाटन झाले. या मॉल मधील वाहनतळात तब्बल १ हजार दुचाकी व १ हजार मोटारी बसू शकतात. लोहगाव विमानतळावर देशांतर्गत विमानांची उड्डाणांची संख्या वाढली आहे. याठिकाणी दररोज सरासरी पंचवीस ते तीस हजारापेक्षा अधिक प्रवाशांची ये-जा सुरू असते. या वाहनतळावर दररोज वीस ते पंचवीस हजार वाहनांची ये-जा होत आहे . दुस-या बाजुला गेल्या सहा महिन्यात मॉलच्या परिसरात थांबणा-या तब्बल सहा हजार मोटारींवर कारवाई करीत ४० लाख रूपये दंड विमानतळ वाहतुक विभागाने वसुल केले आहे .त्यामुळे ऐरोमॉलच्या वाहनतळावर मोटारींची संख्या वाढल्याचे चित्र आहे. लोहगाव विमानतळावर आगम केल्यानंतर प्रवाशांना भव्य मॉलमध्ये प्रवेश करता येते. या मॉलमध्ये प्रवाशांना विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येते यासह प्रवाशांना मनसोक्त पुण्यातील प्रसिद्ध वस्तू व खाद्यपदार्थांची खरेदी करता येते. सुरवातीला ऐरोमॉलच्या वाहनतळावर केवळ १५० दुचाकी व १६० मोटारी थांबत तर मोठ्या प्रमाणात खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या मोटारी आजूबाजुच्या रस्त्यावर थांबलेल्या आढळत. मात्र आता हे चित्र बदलले आहे. वाहनतळावर वाहनांची संख्या वाढत आहे. लोहगाव विमानतळावरून दिल्ली, जयपूर, बंगलूरू आणि कोलकत्ता येथून पुण्यात येणाऱ्या व पुण्यातून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. लोहगाव विमानतळावरून दररोज देशांतर्गत ७५ विमानांची उड्डाणे होत आहेत. त्यामुळे लोहगाव विमानतळावर प्रवाशांची वर्दळ वाढली आहे. अनेक प्रवाशी विमानतळाच्या बाहेरील रस्त्यावर मोटारी लावत असत. यासह खासगी वाहतूक करणाऱ्या मोटारी विमानतळाच्या परिसरातील रस्त्यांवर लावत असत. त्यामुळे विमानतळ प्राधिकरणाने खासगी संस्थेच्या वतीने ऐरोमॉल बांधला. या मॉल मध्ये तब्बल १ हजार दुचाकी व १ हजार मोटारी लावण्याची सोय करण्यात आली. ज्यामुळे बाहेरच्या मोटारी आत मध्ये लावल्या जातात.

> “ लोहगाव विमानतळ परिसरातील रस्त्यांवर अनाधिकृतपणे थांबणा-या वाहनांवर मोठ्या प्रमाणात करवाढ केली जाते. गेल्या सहा महिन्यात सुमारे सहा हजार वाहनांवर कारवाई केली असुन ४० लाख रूपये दंड वसुल केले आहे. त्यामुळे खासगी वाहने ऐरोमॉल मध्ये थांबतात.
>
> – रविंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विमानतळ वहातूक विभाग



### पुण्यातून दिल्लीला दररोज २८ उड्डाणे !

पुण्यातून दिल्लीला सर्वाधिक विविध कंपन्यांच्या २८ विमानांची उड्डाणे होतात. त्यानंतर बंगलूरूसाठी पंधरा विमानांची उड्डाणे. पुण्यातून चेन्नई, कोलकत्ता, हैद्राबाद, अहमदाबाद, अलाहाबाद, जयपूर,कोची, बेळगावसाठी उड्डाणांचा समावेश आहे. पुण्यातून देशांतर्गत विमान सेवेला प्रवाशांची मोठी मागणी आहे.त्यामुळे याठिकाणी प्रवाशांची व त्यांच्या सोबत असलेल्या वाहनांची मोठी वर्दळ असते.

### प्रवाशांचा थेट ऐरोमॉल मध्ये प्रवेश!

विमातळावरील ऐरोमॉल लोहगाव विमान तळावर उतरल्यानंतर आता प्रवाशांना थेट बाहेर असलेल्या ऐरोमॉल मध्ये प्रवेश मिळतो. या मॉल मध्ये पुण्यातील सर्व प्रसिध्द खाद्यपदार्थ, वस्तू, दागिने, हॉटेल मधील विविध खाद्यपदार्थांची आस्वाद घेता येते. त्यामुळे प्रवासी पुण्यात दाखल झाल्यानंतर थोडा विरंगुळा, भोजन आणि मनसोक्त खरेदी करतात. या मॉलमधील वाहनतळाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# निगडी दुर्घटनेतील मृत कामगारांना प्रत्येकी रू. १० लाखांची मदत द्या!



**पिंपरी । वार्ताहर**

पिंपरी निगडी परिसरात १५ ऑगस्ट २०२५ रोजी, स्वातंत्र्यदिनी, एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. बीएसएनएलच्या ऑप्टिकल फायबर लाईन दुरुस्तीचे काम करत असताना तीन मजुरांचा डकमध्ये गुदमरून मृत्यू झाला. या गंभीर दुर्घटनेनंतरही बीएसएनएलच्या संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असून, या प्रकरणी अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. यामुळे कष्टकरी कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, आमदार अमित गोरखे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना ईमेलद्वारे पत्र पाठवून या घटनेची माहिती दिली.

या पत्रात त्यांनी मृत कामगारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आणि जखमींच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. या दुर्घटनेत श्री. दत्ता होलारे, श्री. लखन धावरे, आणि श्री. साहेबराव गिरसेप या तीन निष्पाप कामगारांनी आपले प्राण गमावले. स्वातंत्र्यदिनासारख्या शुभ दिवशी त्यांच्या घरातील आधारस्तंभ गमावल्याने कुटुंबांची अवस्था दयनीय झाली आहे.

गोरखे यांनी आपल्या पत्रात जखमींच्या उपचाराची जबाबदारी सरकारने घ्यावी अशीही मागणी केली आहे. यासोबतच, या घटनेस जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करून त्यांनी पीडित कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

**कायदेशीर कारवाईची मागणी:**

या प्रकरणाची गंभीर दखल घेत कष्टकरी कामगार पंचायतचे अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. आज सकाळी त्यांनी निगडी

**पान ३ वर...**

# एमपीएससीसाठी ‘प्रतिभा सेतू’ योजना लागू करा; आमदार अमित गोरखे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

**पिंपरी-चिंचवड । वार्ताहर**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर,महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' ही योजना राज्यात लागू करावी, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीमुळे MPSC च्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यापूर्वी, नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यानही आमदार गोरखे यांनी हा महत्त्वाचा मुद्दा सभागृहात उपस्थित करत सरकारचे लक्ष वेधले होते.

आमदार गोरखे यांनी आपल्या निवेदनात या योजनेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. 'प्रतिभा सेतू' या योजनेअंतर्गत यूपीएससीच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या परंतु काही कारणांमुळे अंतिम निवड न झालेल्या उमेदवारांची माहिती संकलित केली जाते. ही माहिती एक पोर्टल तयार करून सरकारी, खाजगी आणि इतर संस्थांना उपलब्ध करून दिली जाते,



ज्यामुळे या पात्र उमेदवारांना त्यांच्या योग्यतेनुसार नोकरीच्या संधी मिळतात.

त्याच धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा अत्यंत स्पर्धात्मक असतात आणि दरवर्षी हजारो विद्यार्थी राज्यसेवा, गट ब आणि गट क परीक्षांमध्ये सहभागी होतात. त्यापैकी, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत देऊनही अंतिम निवड न झालेल्या विद्यार्थ्यांकडे दर्जेदार शैक्षणिक पात्रता आणि आवश्यक कौशल्ये असतात. या उमेदवारांची माहिती एकत्र करून एक पोर्टल तयार केल्यास, ही माहिती खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था, महापालिका, जिल्हा परिषद आणि इतर सहकारी संस्थांसोबत शेअर करता येईल. याचा उपयोग तात्पुरत्या किंवा प्रकल्पाधारित भरतीमध्ये होऊ शकतो, ज्यामुळे


**पान ३ वर...**

# विमान नगर येथील एनप्लांट्स नर्सरीमध्ये दुर्मिळ ब्लू मॉरमन फुलपाखरू

## प्रियंका आणि निलेश नागरी जैवविविधता संरक्षणाचे समर्थक

**पूणे । प्रतिनिधी**

विमान नगर येथील एनप्लांट्स नर्सरी लँडस्केप सर्व्हिसेसमध्ये ब्लू मॉरमन (Papilio polymnestor) या दुर्मिळ फुलपाखराचा अनोखा आणि आश्चर्यकारक अनुभव घेतला गेला आहे. हे फुलपाखरू प्रामुख्याने दक्षिण भारत आणि श्रीलंका येथे, तसेच जंगली भागात मोठ्या प्रमाणात पावसात आढळते. महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू म्हणून ओळखले जाणारे ब्लू मॉरमन भारतातील



दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे फुलपाखरू असून त्याचे पंख १२० ते १५० मिमी लांबीचे असतात. हे फुलपाखरू एनप्लांट्स नर्सरीमध्ये विशेषतः झिझिफस (बोर) या झाडांवर आढळले आहे, जे ब्लू मॉरमनच्या अळ्यांसाठी एक महत्वाचे वनस्पतिपूरक आहे. प्रियंका आणि निलेश, जे दोघेही जैवविविधतेत मास्टर्स आहेत, यांनी स्थापन केलेली नर्सरी वर्षभर विविध फुलपाखरांना आश्रय देते. निलेश म्हणाले, आमच्या नर्सरीमध्ये बेल, कढीपत्ता आणि लिंबूच्या झाडांवर फुलपाखरांची अंडी आढळतात. आम्ही कीटकनाशकांचा वापर टाळतो जेणेकरून अळ्या सुरक्षितपणे वाढून सुंदर फुलपाखरांमध्ये परिवर्तित होऊ

**पान ३ वर...**

# चार वर्षात ६४ हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला थकबाकी नसलेल्याचा दाखला

## कर संकलन विभागाची ऑनलाईन सेवा नागरिकांसाठी ठरतेय उपयुक्त!

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड महापालिकेने मालमत्ता कर थकबाकी नसलेला दाखला बसल्या मिळावा यासाठी मार्च २०२२ पासून ऑनलाईन सुविधा सुरू केली आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत १३,२१३ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

यापूर्वी, नागरिकांना थकबाकी नसल्याचा दाखला मिळवण्यासाठी महापालिकेच्या कार्यालयात जाऊन अर्ज करावा लागे. अनेक वेळा कार्यालयात फेरफटका मारावा लागत असल्यामुळे नागरिकांना वेळ आणि श्रमाचा अपव्यय होत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी, कर आकारणी विभागाने महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर ही सेवा उपलब्ध करुन दिली आहे.

२०२२ ते जुलै २०२५ पर्यंत एकूण ६४ हजारांहून अधिक नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने थकबाकी नसल्याचा दाखला घेतला आहे.

ही सेवा सुरू झाल्यापासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आता ते घरबसल्या विना शुल्क दाखला डाउनलोड करू शकतात.

**ऑनलाईन दाखला काढण्याची पद्धत:**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संकेतस्थळाला भेट द्या. मुख्य पृष्ठावरील 'नागरिक' या पर्यायावर क्लिक करा आणि 'मालमत्ता कर विभाग' उघडा. त्यानंतर मालमत्तेला जोडलेला मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाका.

त्यानंतर तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी (जढ्झ) येईल. तो ओटीपी टाकाल्यावर, ‘कर थकबाकीदार नसल्याचा दाखला’ असा पर्याय दिसेल. त्या पर्यायावर क्लिक केल्यानंतर दाखला डाउनलोड होईल.

**वर्षानुसार ऑनलाईन दाखले घेणाऱ्यांची संख्या:**

२०२२- २३ : ४,७२५
२०२३- २४ : १६,९०६
२०२४-२५ :२९,७५७
२०२५- २६ (जुलै अखेरपर्यंत) :१३,२१३

पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ वाचत असून शासकीय यंत्रणेवरील ताणही कमी झाला आहे. मालमत्ता कर भरणारे अनेक नागरिक पूर्वी दाखला मिळवण्यासाठी महापालिकेच्या कार्यालयात दिवसेंदिवस फेर्या मारत, दलालांचा त्रास सहन करत किंवा अनावश्यक विलंबाला सामोरे जात होते. मात्र आता एका क्लिकवर ही सुविधा उपलब्ध झाल्याने पारदर्शकता वाढली असून नागरिकांचा विश्वास महापालिकेवर अधिक दृढ झाला आहे.

याशिवाय, या ऑनलाइन सेवेमुळे ‘डिजिटल इंडिया’ मोहिमेला चालना मिळाली आहे. महापालिकेच्या महसूल संकलनातही अप्रत्यक्षपणे वाढ झाली असून भविष्यात इतर करसंबंधी सेवा देखील डिजिटल स्वरूपात उपलब्ध करण्याची तयारी सुरू असल्याचे महापालिकेच्या कर आकारणी विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पुढील काळात नागरिकांना आणखी सुलभ आणि आधुनिक पद्धतीने शासकीय सेवा मिळणार आहेत.

- ◈ चार वर्षात ६४ हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला थकबाकी नसलेल्याचा दाखला
- ◈ कर संकलन विभागाची ऑनलाईन सेवा नागरिकांसाठी ठरतेय उपयुक्त!

तज्ज्ञांच्या मते, या उपक्रमामुळे कागदपत्रांची नासाडी थांबून पर्यावरणपूरक पद्धतीने कामकाज होण्यास हातभार लागला आहे. आधी एका दाखल्यासाठी किमान काही दिवसांचा कालावधी लागत असे, मात्र आता काही मिनिटांतच नागरिकांच्या हातात दाखला उपलब्ध होत असल्याने ही सेवा सर्वांसाठी फायदेशीर ठरत आहे. विशेष म्हणजे ही सुविधा पूर्णपणे मोफत असल्याने सव 'सामान्य नागरिकांनाही याचा मोठ्या

**पान ३ वर...**

> “ महापालिकेच्या कामकाजात डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून नागरिकांना घरबसल्या सेवा मिळाव्यात, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. मालमत्ता कर विभागाने सुरू केलेली ‘थकबाकीदार नसल्याच्या ऑनलाईन दाखल्याची’ सुविधा हा त्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. नागरिकांचा वेळ वाचावा, त्यांना कोणतीही अडचण न येता आवश्यक कागदपत्रे सहज मिळावा, हाच आमचा उद्देश आहे.
>
> प्रदीप जांभळे पाटील – अतिरिक्त आयुक्त पिंपरी– चिंचवड महापालिका

> “ थकबाकीदार नसल्याचा दाखला ऑनलाईन मिळू लागल्यामुळे नागरिकांची खूप मोठी गैरसोय टळली आहे. आधी लोकांना कार्यालयात यावं लागायचं, वेळ जात होता, कागदपत्रांची दगदग होती - आता हे सगळं टळलं आहे. नागरिक घरबसल्या ही सेवा वापरत आहेत, याचा आम्हाला आनंद आहे. ही सुविधा आणखी सोपी आणि उपयुक्त कशी करता येईल, यावर आमचा भर आहे.
>
> अविनाश शिंदे , सहाय्यक आयुक्त कर संकलन विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका

# मुस्लिम बँकेच्या अध्यक्षपदी तन्वीर इनामदार, उपाध्यक्षपदी ॲड.आयुब शेख

**पुणे । प्रतिनिधी**

दि मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या अध्यक्षपदी तन्वीर पी. इनामदार यांची, उपाध्यक्षपदी ॲड. आयुब शेख यांची बिनविरोध निवड झाली आहे.पुण्यातील मुख्य कार्यालयात १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. तनवीर इनामदार हे माहिती- तंत्रज्ञान विषयातील तज्ञ असून एड.आयुब शेख हे सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. या निवडीनंतर सर्व संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले. दि मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पुणे ही



तन्वीर पी.इनामदार, ॲड.आयुब शेख

१९३१ साली स्थापन झालेली बँक असून राज्यभरात २३ शाखा आहेत.

'सर्वसामान्यांची बँक हा बँकेचा नावलौकिक पुढे कायम ठेवू आणि बँकेला आणखी प्रगतीपथावर नेऊ', असे तन्वीर इनामदार आणि एड.आयुब शेख यांनी यावेळी सांगितले.बँकेद्वारे आज प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली.

# पुण्यात साकारले कॅमेऱ्यांचे अनोखे संग्रहालय

**पुणे । वार्ताहर**

वर्ल्ड फोटोग्राफी डे (१९ ऑगस्ट) निमित्त पुण्यात कॅमेऱ्यांचे एक नवे संग्रहालय उद्या सिंहगड रस्त्यावर सर्वांसाठी खुले होणार आहे. 'राजपाठक क्रिशन स्टुडिओज' असे या संग्रहालयाचे नाव असून, पुण्यातील हे दुसरे खासगी कॅमेरा संग्रहालय आहे. या संग्रहालयामुळे पुणेकरांना फोटोग्राफीच्या इतिहासाचा अनोखा प्रवास अनुभवता येणार आहे. कॅमेऱ्याचा शोध लागून १८६ वर्षे पूर्ण झाली असली, तरी फोटोंप्रमाणेच कॅमेऱ्यांबद्दलही

**पान ३ वर...**

## संपादकीय....

# कारागृहात १२५० कैद्यांना गंभीर आजार; कारागृहातच घेणार अखेरचा श्वास

लोकशाही राष्ट्रात न्यायव्यवस्था मजबूत आहे. याठिकाणी दोषींवर कारवाई होतेच. अनेकांना त्यांच्या कृत्याबद्दल नंतर पश्चाताप होता. तर अनेक कैद्यांना कारागृहात असाध्य रोगाने पछाडलेली असते. या ठिकाणी उपचारही चांगले होत नाही. ना सुटका होते अशी त्यांची अवस्था असते. कारागृह प्रशासन त्यांना वयोमानानुसार सोडावे, अशी मागणी न्यायालयात करते. त्यांची वयोमानानुसार सुटका झाली तरी कुटुंबातील नातेवाईक त्यांना स्वीकारण्यास तयार नसतात. त्यामुळे त्यांनी केलेल्या अपराधाची शिक्षा न्यायव्यवस्थाही देते आणि विधाताही देत असल्याचे वास्तव राज्यातील विविध कारागृहातील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या कैद्यांकडे पाहिल्यानंतर दिसते.

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक आदेश दिला आहे. यामध्ये देशातील कारागृहात शिक्षा पूर्ण झालेल्या कैद्यांना सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी होईल तेव्हा होईल पण सध्या राज्यातील विविध कारागृहात साडेबाराशे पेक्षा अधिक कैदी गंभीर स्वरूपाच्या आजाराने ग्रस्त आहेत. यामध्ये सिद्धदोष कैद्यांची संख्या पाचशे असून न्यायाधीन कैद्यांची संख्या सातशे पेक्षा अधिक आहे. या कैद्यांना ब्रेन टयुमर, एचआयव्ही, कर्करोग, हृदयासंबंधीचे आजार, क्षयरोग, कुष्टरोग आदी व्याधींनी ग्रासले आहेत. तर काहीजण कोमात आहेत. अशा कैद्यांचा अहवाल न्यायालयाला पाठवून किरकोळ गुन्हे असलेल्यांना
मुक्तता करण्यासंदर्भात विचारणा करण्यात येणार येत असल्याची माहिती कारागृह प्रशासन करते.

राज्यातील विविध कारागृहांमध्ये सिध्ददोष आणि न्यायधीन कैद्यांची अधून-मधून आरोग्य तपासणी होत असते. यामध्ये अनेक कैद्यांना असाध्य रोग झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये आठशे कैद्यांना हृदयरोग, २८६ जणांना एचआयव्ही, सव्वाशे कैदी मुत्राशयाच्या आजाराने ग्रस्त आहेत. सोळा जण कर्करोगाचा सामना करीत आहेत. सतराजण कुष्ठरोगाने पीडित आहेत. सहा जणांना ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे अचेतन अवस्थेत ते पडलेले आहेत.

राज्यातील मध्यवर्ती कारागृहात रुग्णालय असते. या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून ते मानसोपचार तज्ज्ञांपर्यंतचे डॉक्टर असतात. मात्र, या ठिकाणी कैद्यांना चांगले उपचार मिळतील याची खात्री नसते. असाध्य आजार झालेल्या कैद्यांना सरकारी रुग्णालयात पाठविले जाते. मात्र, तेथेही चांगले उपचार मिळतील याची शाश्वती नसते. त्यामुळे कैद्यांचा आजार बळावत जातो. त्यांच्यावर गंमीर गुन्हे असल्यामुळे त्यांना बाहेर सोडता ही येत नाही. सोडले तर त्यांना त्यांचे कुटुंब सुद्धा स्विकारतील याची शक्यता नसते. त्यामुळे असाध्यरोग असलेले कैदी असह्य वेदनेने कारागृहातच वास्तव्यास असतात. त्यांना बाहेर सोडण्यासाठी कारागृह प्रशासन उच्च न्यायालयाकडे मागणी केली आहे. त्यावर अद्याप निर्णय झाला नाही. त्यामुळे अशा कैद्यांचा शेवटचा श्वास सुद्धा कारागृहातच घेतील असे कारागृहातील प्रशासनातील अधिकारी यांचे म्हणणे आहे.

**राज्यातील पाचशे कैदी मानसिक आजारी**

राज्यातील साधारणत: पाचशे कैदी मानसिक आजारी आहेत. 'माणुस ' समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याला कुटुंब, नातेवाईक किंवा मित्र मंडळींपासून अर्थात समाजापासून दूर ठेवले तर त्याला मानसिक आजार होतो. राज्यातील अनेक कारागृहात गंमीर गुन्ह्यांच्या कैद्यांना अतिसुरक्षित अशा बराकीत ठेवले जाते. मध्यवर्ती कारागृहात अंडासेल आहे. या सेल मध्ये कैद्यांना एकट्याला राहावे लागते. त्यामुळे असे कैदी मानसिक आजारी होतात. त्यांना कारागृहातील मानसोपचार तज्ज्ञ उपचार करतात. त्यांना नियमित औषधोपचार घ्यावे लागतात. संगीत ऐकणे, टीव्ही पाहणे, वृत्तपत्र, पुस्तके वाचणे आवश्यक असते. मात्र, अनेक कैदी असे पर्याय निवडत नाहीत. ते आपल्या बराकीत एकटेच पडून असतात. सतत विचार करीत असतात त्यामुळे त्यांना आजार बळावतो. त्यानंतर त्यांना मनोरुग्णालयात दाखल करण्याची वेळ येते.

कारागृहात प्रत्येक बराकी टीव्हीची सोय केलेली असते. यासह कारागृहात 'येरवडा प्रिझन रेडिओ' हे कम्युनिटी रेडिओ आहे. यावर कैदीच रेडिओ जॅकी असतात. ते रेडिओच्या माध्यमातून विविध कार्यक्रम सादर करीत असतात. कारागृहात मोठे सुसज्ज ग्रंथालय आहेत. यामध्ये विविध लेखकांची पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे आहेत. याचा कैदी पुरेपुर वापर करतात. असे असले तरी गंभीर आजारी असलेल्य कैदी रूग्णांचा मानवतेच्या दृष्कीकोनाने विचार होण्याची आवश्यकता आहे.

मानवतेच्या दृष्टीने पाहिले तर अशा कैद्यांना केवळ गुन्हेगार म्हणून नव्हे तर रुग्ण म्हणून पाहणे आवश्यक आहे. त्यांच्यावर वैद्यकीय दृष्ट्या योग्य उपचार मिळणे ही त्यांची मूलभूत मानवी हक्काची गरज आहे. अनेक देशांमध्ये 'कम्पॅशनेट रिलीज' धोरण लागू करून असाध्य आजार असलेल्या कैद्यांना शेवटच्या काळात आपल्या कुटुंबीयांबरोबर राहण्याची संधी दिली जाते. आपल्या देशातही अशा धोरणाची अंमलबजावणी व्हायला हवी. कारागृहातील अपुऱ्या वैद्यकीय सोयी आणि गर्दीमुळे रोगप्रसाराची भीती कायम असते. त्यामुळे कैद्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे म्हणजे समाजालाही सुरक्षित ठेवणे होय. न्यायालये आणि सरकारने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

# निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयाचा आधार

## ५ हजार रुग्णांना साडेसहा कोटी रुपयांची वैद्यकीय मदत

समाजातील निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांच्या माध्यमातून मोठा आधार मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या प्रयत्नांतून १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या पाच महिन्यात पुणे जिल्ह्यातील ५ हजार ११२ रुग्णांना तब्बल ६ कोटी ५२ लाख ५६ हजार ६५७ रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

**धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ अअ आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या (रिट याचिका क्र. ३१३२/२००४) निर्णयानुसार धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांसाठी मोफत आणि १० टक्के खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध करून देणे बंधनकारक केले आहे.

**विशेष वैद्यकीय मदत कक्षाची भूमिका**

निर्धन व दुर्बल रुग्णांना धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा पारदर्शक व तातडीने उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक आहेत.

या कक्षाच्या कार्यकक्षेत पुढील बाबींचा समावेश होतो : धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल रुग्णांना त्वरित उपलब्ध करून देणे, उपलब्ध/रिक्त खाटांची माहिती रुग्णांना रिअल-टाईममध्ये देणे, कोणत्या रुग्णालयात कोणत्या आजारावर उपचाराची सुविधा आहे, याबाबत माहिती देणे, रुग्ण व नातेवाईकांना योजनेंतर्गत मिळणाऱ्या सवलतींची माहिती सहजतेने देणे, रुग्णालयात नियुक्त समन्वयकांमार्फत गरजूंना मदत करणे. या प्रक्रियेसाठी स्वतंत्र ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे.




धर्मादाय रुग्णालयातील खाटा खरोखरच निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना मिळाव्यात, यासाठी राज्यस्तरीय समितीमार्फत देखरेख ठेवली जाते. विशेष मदत कक्षामुळे रुग्णांना खाटांची उपलब्धता, उपचार सुविधा व शासनाच्या सवलतींची माहिती रिअल-टाईम मध्ये मिळते. त्यामुळे गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळून त्यांचे प्राण वाचण्यास मोठी मदत होत आहे.

**जिल्हास्तरीय समिती व पुण्यातील धर्मादाय रुग्णालये**

पुणे जिल्ह्यातील एकूण ५८ धर्मादाय रुग्णालयांतून निर्धन व दुर्बल रुग्णांना लाभ मिळत आहे. या रुग्णालयांना शासनाच्या विविध कर व अनुदान सवलती मिळतात. त्यामुळे गरीब रुग्णांसाठी आरक्षित खाटा उपलब्ध करून देणे त्यांच्यावर कायदेशीर जबाबदारी आहे. निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दराने उपचार मिळावेत, यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत आहे. या समितीमार्फत धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटांची माहिती ऑनलाईन संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येते आणि त्यावर राज्यस्तरीय मदत कक्ष सतत देखरेख ठेवतो.

**वैद्यकीय मदतीसाठी अर्ज कसा करावा?**

रुग्णांना मदत मिळण्यासाठी जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाकडे विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा लागतो.

**आवश्यक कागदपत्रे :**

१. रुग्णाचे आधारकार्ड, शिधापत्रिका, पॅनकार्ड
२. उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार यांच्याकडून)
३. रुग्णालयाने दिलेले उपचाराचे अंदाजपत्रक

**कुठे संपर्क साधावा?**

जिल्हाधिकारी कार्यालय कक्ष, पुणे. पत्ता: खोली क्रमांक १०, तळमजला, जुनी जिल्हा परिषद, पुणे

डॉ. मानसिंग साबळे, जिल्हास्तरीय कक्षाचे वैद्यकीय अधिकारी तथा अध्यक्ष आहेत,

वैद्यकीय मदतीचा अर्ज भरण्यासंदर्भात अडचण आल्यास कक्ष प्रमुखांच्या ८०८७६७८९७७ या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच लीषीपिशसारळश्र.लो ईमेल पत्त्यावर क्रमांकावर संपर्क साधावा.

**टोल-फ्री हेल्पलाईन** : १८०० १२३ २२११

**संकेतस्थळ:** https://charitymedicalhelpdesk.maharashtra.gov.in

रामेश्वर नाईक,कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष, मंत्रालय मुंबई

धर्मादाय रुग्णालय निर्धन व दूर्बल घटकांतील रुग्णांसाठी आशादायी ठरत आहे. पारदर्शक व ऑनलाईन प्रणालीमुळे आरक्षित खाटांची माहिती रूग्ण व नातेवाईकांना सहज उपलब्ध होत आहे. त्यातून रूग्णांना वेळेत उपचार मिळत आहेत. पुणे जिल्ह्यात वितरित करण्यात आलेली ६.५२ कोटींची मदत ही मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

**- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी**

धर्मादाय रुग्ण योजनेअंतर्गत जिल्ह्यात एकूण ५८ धर्मादाय रुग्णालये असून निर्धन व दूर्बल घटकांतील रुग्णांना लाभ देण्यात येत आहे. रुग्णालये धर्मादाय स्वरुपाची असल्याने त्यांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ देण्यात येतो.

रुग्णालयांनी गरिबांकरिता आरक्षित खाटा पारदर्शकपणे उपलब्ध करून देऊन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी रुग्णांनी शासनाने विहीत केलेल्या अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# सार्वजनिक गणेशोत्सव : उद्देश, उत्क्रांती आणि बदललेले स्वरूप

भारतीय संस्कृती ही उत्सवप्रियतेसाठी जगप्रसिद्ध आहे. सण-उत्सव म्हणजे भारतीय जीवनपद्धतीचे प्राण असे म्हटले जाते. कोणत्याही गोष्टीचा आनंद सामूहिकरीत्या साजरा करण्याची परंपरा आपल्या रक्तात भिनलेली आहे. त्यामुळेच धर्म, समाज आणि राष्ट्रीयता यांच्याशी संबंधित प्रत्येक प्रसंग उत्सवाच्या स्वरूपात उभा राहतो. नुकतेच झालेल्या दहीहंडी उत्सवाचे व्यापक स्वरूप आपण अनुभवले. परंतु या सर्व उत्सवांकडे पाहताना एक चिंताजनक वास्तव समोर येते - सध्या अनेक ठिकाणी उत्सव हे केवळ इव्हेंट मॅनेजमेंट मध्ये रूपांतरित होत आहेत. धार्मिकता, अध्यात्म आणि सामाजिक जागृती या मूळ उद्देशांपेक्षा सजावट, खर्च, स्पर्धा आणि दिखावा यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. या संदर्भात सार्वजनिक गणेशोत्सव हा अत्यंत बोलका उदाहरण आहे.

**लोकमान्य टिळक आणि सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात**

गणेशोत्सव हा मूळतः घरगुती सण. भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून दहा दिवस घराघरांत श्रीगणेशाची प्रतिष्ठापना केली जायची. पूजा, आरत्या, प्रसाद, कुटुंबीयांचा मेळावा आणि विसर्जन यातच सणाची रंगत असायची. परंतु १८९३ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी या घरगुती उत्सवाला सार्वजनिक रूप दिले.

यामागील पार्श्वभूमी अत्यंत महत्त्वाची आहे. त्या काळात इंग्रजांच्या राजवटीत भारतीय समाज भयभीत आणि विखुरलेला होता. सार्वजनिक सभा घेणे, राजकीय विचार मांडणे, एकत्र येणे - हे सारे ब्रिटीशांनी बंधनकारक केले होते. समाजात अस्पृश्यता, जातिभेद, अज्ञान आणि परकीय संस्कृतीचे अतिक्रमण वाढले होते. टिळकांनी जाणले की राष्ट्राला संघटित करायचे असेल तर एक समान धार्मिक-सांस्कृतिक धागा हवा. त्यासाठी गणपतीसारखा विघ्नहर्ता देव सर्व हिंदू समाजात लोकप्रिय असल्याने त्याच्या पूजेभोवती लोकांना एकत्र आणण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांच्याशी झालेल्या संवादानंतर टिळकांनी गणेशपूजा सार्वजनिक स्वरूपात करण्याचे ठरवले. टिळकांनी म्हटले, मी एकट्याने पूजा केली तर उपयोग नाही; संपूर्ण राष्ट्राने हा उत्सव साजरा केला पाहिजे. आणि इथूनच जन्म झाला सार्वजनिक गणेशोत्सवाचा.

**टिळकांचे मूळ उद्देश**

लोकमान्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला केवळ धार्मिक विधीचा रंग दिला नाही; तर त्यामागे त्यांनी ठाम सामाजिक-राजकीय विचार मांडला. १८९४ मधील त्यांच्या भाषणात त्यांनी तीन प्रमुख उद्देश स्पष्ट केले:

**धर्मजागृती** - हिंदू समाजात धर्मशिक्षणाचा प्रसार करणे, अध्यात्माची ओढ निर्माण करणे.

**राष्ट्रजागृती** - समाजाला संघटित करून स्वराज्यप्राप्तीसाठी तयार करणे.

पाश्चात्त्य संस्कृतीच्या अतिक्रमणाला प्रतिकार



- परकीय विचारांना आंधळेपणाने झुकण्याऐवजी भारतीय परंपरा, कला, संस्कृती यांचा अभिमान बाळगणे.

गणेशोत्सव हा एक धार्मिक उत्सव असून त्यात सर्व स्तरांतील लोक सहजपणे सहभागी होऊ शकतात. जात-पात, श्रीमंती-गरिबी याच्या भिंती ओलांडून प्रत्येकाला समान सहभाग मिळतो. त्यामुळे हा उत्सव राष्ट्रीय एकतेचा आधार बनला.

**स्वातंत्र्यलढ्यातील योगदान**

गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे सामूहिक जमावांना धार्मिक मेळावा म्हणून इंग्रजांना थांबवता येत नव्हता. या मेळाव्यांतूनच राष्ट्रभक्तीची गीते गायली गेली, क्रांतिकारकांचे विचार मांडले गेले, स्वराज्याच्या हाका देण्यात आल्या. व्याख्याने, कीर्तन, नाटके, प्रवचने या सर्वांतून भारतीय समाजाला स्वातंत्र्याची जाणीव करून देण्यात आली. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण न राहता राष्ट्रीय जागृतीचा मंच बनला.

**गणेशोत्सवाचा विस्तार**

मुंबई, पुणे, ठाणे यापुरता मर्यादित असलेला हा उत्सव आज महाराष्ट्रभर आणि देशभर पसरला आहे. महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, गोवा, गुजरात, दिल्ली, मध्यप्रदेश येथेही सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर होतो. परदेशात अमेरिकेत, ब्रिटनमध्ये, दुबईत, आफ्रिकेत - जिथे मराठी माणूस आहे तिथे गणेशोत्सव पोहोचला आहे.

आज या उत्सवामुळे राज्याच्या अर्थकारणात हजारो कोटींची उलाढाल होते. मूर्तीकार, सजावट व्यावसायिक, विद्युत-रोषणाई, मांडव भाड्याने देणारे, वाद्यवृंद, केटरिंग, कपडे, फुले अशा असंख्य व्यवसायांना गणेशोत्सव रोजगाराचा आधार बनला आहे. त्यामुळे हा उत्सव सांस्कृतिक-आर्थिक महोत्सव बनला आहे.

**बदललेले स्वरूप - उत्सव की इव्हेंट?**

परंतु दुर्दैवाने आजमितीला हा उत्सव टिळकांच्या मूळ उद्देशांपासून दूर गेला आहे. धर्मजागृती आणि राष्ट्रजागृतीचा विचार दुय्यम ठरला आहे. खालील बाबी याचे उदाहरण आहेत:

**वर्गणीचे प्रश्न** - अनेक ठिकाणी नागरिकांवर जबरदस्तीने वर्गणी लावली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसतानाही समाजात प्रतिष्ठा टिकवण्यासाठी लोकांना पैसे द्यावे लागतात.

**मंडळांची स्पर्धा** - छोट्या छोट्या अंतरावर अनेक मंडळे निघतात. उंच मूर्ती, भव्य सजावट, प्रकाशयोजना यातून एकमेकांशी स्पर्धा केली जाते. परिणामी अपव्यय आणि भांडणांची उदाहरणे वाढतात.

**मूर्ती विसर्जनातील अवहेलना** - मोठ्या मूर्तींचे विसर्जन करताना अपुरे नियोजन असल्याने काही वेळा मूर्ती पूर्णपणे विसर्जित न होता दुर्लक्षित होतात. हा अत्यंत वेदनादायी प्रकार आहे.

**डीजे संस्कृती** - मंगलवाद्ये, भजने यांची जागा आता डीजे आणि चित्रपट गाण्यांनी घेतली आहे. काही ठिकाणी नृत्याच्या नावाखाली अश्लील हालचाली होतात.

**मद्यपान व जुगार** - विसर्जन मिरवणुकीत किंवा मंडपाच्या परिसरात मद्यपान, जुगार यासारख्या अपप्रवृत्ती शिरल्या आहेत.

**स्वच्छतेचा अभाव** - मंडप परिसरात कचरा, नाल्यांत मूर्तींचे अवशेष टाकणे, प्लास्टिकचा वापर - या सर्वांमुळे धार्मिक उत्सवाला कलंक लागत आहे.

**सामाजिक उपक्रमांचा अभाव** - पूर्वी मंडपांतून व्याख्याने, समाजोपयोगी कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, भजन-कीर्तन होत असत. आज मात्र मनोरंजनप्रधान कार्यक्रम - लावणी, चित्रपट गाणी यांचा भरणा वाढला आहे.

**सामाजिक परिणाम**

या बदलामुळे धार्मिकतेपेक्षा दिखावा अधोरेखित होतो आहे. उत्सवाच्या निमित्ताने समाजातील ऐक्य वाढावे, लोकांमध्ये धर्मभक्ती निर्माण व्हावी, मुलांना संस्कार मिळावेत - हे उद्देश मागे पडत आहेत. उलट समाजात वाद, दंगली, प्रदूषण, आवाजाचा त्रास, आरोग्याला धोके हे नवे प्रश्न पुढे येत आहेत.

**आजची आवश्यकता** - सात्विक आणि समाजोपयोगी गणेशोत्सव

लोकमान्यांचा मूळ संदेश आज विसरला गेला आहे. त्यामुळे आपल्याला पुन्हा एकदा आत्म परीक्षण करण्याची गरज आहे.

**धर्मशिक्षणाचा प्रसार** - मंडपांतून भजने, कीर्तन, प्रवचने, बालकथा, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

**सामाजिक उपक्रम** - रक्तदान शिबिरे, वैद्यकीय तपासणी, पर्यावरण संवर्धन, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम यांना प्राधान्य द्यावे.

**पर्यावरणपूरक मूर्ती** - शाडू मातीच्या मूर्ती, रंगांमध्ये रसायनांचा वापर टाळावा.

**शिस्तबद्ध विसर्जन** - नदी-तलाव प्रदूषित होऊ नयेत म्हणून कृत्रिम तलाव, नियोजनबद्ध व्यवस्था करावी.

**सांस्कृतिक सात्विकता** - आरत्या, स्तोत्रे, भक्तिगीते यांच्यामुळे वातावरण आध्यात्मिक बनते. डीजे, कर्णकर्कश गाणी यांचा वापर टाळावा.

**एकोप्याची जाणीव** - वर्गणी स्वेच्छेने घ्यावी, जबरदस्ती टाळावी. समाजातील सर्व घटक सहभागी व्हावेत यासाठी संवाद साधावा.

सार्वजनिक गणेशोत्सव हा भारतीय इतिहासातील एक अद्वितीय प्रयोग आहे. लोकमान्य टिळकांनी या उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्राला संघटित केले, स्वातंत्र्यलढ्यास धार्मिक अधिष्ठान दिले. आज मात्र या उत्सवाचे स्वरूप बदलत चालले आहे. धर्मजागृती व राष्ट्रजागृतीऐवजी स्पर्धा, दिखावा, अपव्यय आणि अपप्रवृत्ती यांना जागा मिळत आहे.

त्यामुळे आपल्यावर एक जबाबदारी आहे - हा उत्सव परत एकदा सात्विक, समाजोपयोगी आणि राष्ट्रहिताचा बनवण्याची.

लोकमान्यांनी दाखवलेला मार्ग लक्षात ठेवून आपण गणरायाची पूजा केवळ मूर्तीसमोरच नाही तर आपल्या कृतीतून केली पाहिजे. उत्सव हा एकतेचा, प्रबोधनाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा साधन बनला पाहिजे.

गणरायाचे आगमन हे विघ्नांचे निवारण आणि मंगलकार्याचे प्रारंभ याचे प्रतीक आहे. त्याच भावनेतून आपले गणेशोत्सव परत भक्ती आणि राष्ट्रकार्याचा उत्सव बनला, तरच टिळकांचे स्वप्न खरे ठरेल.

**- विक्रम कदम -**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे - ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

## निगडी दुर्घटनेतील मृत कामगारांना प्रत्येकी रू. १० लाखांची मदत द्या!

पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन दुर्घटनेची सखोल माहिती घेतली. यावेळी पोलिसांनी बीएसएनएल अधिकाऱ्यांकडून सहकार्य मिळत नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर डॉ. बाबा कांबळे यांनी आकुर्डी येथील बीएसएनएल कार्यालयाची पाहणी केली, परंतु तिथे कोणतेही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हते. यानंतर त्यांनी चिंचवड येथील बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयात जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि या प्रकरणी तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

## एमपीएससीसाठी 'प्रतिभा सेतू' योजना लागू करा; आमदार अमित गोरखे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

या तरुणांनी घेतलेली मेहनत आणि जर वयाची मर्यादा निघून गेली असलेल तर त्यांच्यासाठी ही संधी महत्त्वाची ठरू शकते. या योजनेमुळे राज्यातील सामाजिक समता, प्रशासकीय प्रतिनिधित्वाची संधी आणि युवा सक्षमीकरणाला मोठा हातभार लागेल, असा विश्वास आमदार गोरखे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे हजारो होतकरू विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी आशा गोरखे यांनी व्यक्त केली आहे.

## विमान नगर येथील एनप्लांट्स नर्सरीमध्ये दुर्मिळ ब्लू मॉरमन फुलपाखरू

शकतात. आम्ही फुलांचे मकरंद गोळा करणारी अनेक फुलपाखरे तसेच मधमाश्या आमच्या नर्सरी मध्ये पाहतो, ज्यामुळे नागरी जैवविविधता वाढते. प्रियंका यांनी त्यांच्या सेंद्रिय दृष्टिकोनाचे महत्त्व सांगितले. आम्ही नागरी भागात चांगले पर्यावरण संवर्धन करण्यावर विश्वास ठेवतो. आमची नर्सरी सेंद्रिय तत्वांवर आधारित आहे, ज्यामध्ये आम्ही हानिकारक कीटकनाशकांचा किंवा पॉलिहाउस कव्हरचा वापर टाळतो. यामुळे केवळ वनस्पतीच नव्हे तर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या सर्व जीवांसाठी एक आरोग्यपूर्ण वातावरण तयार होते, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याशिवाय, प्रियंका आणि निलेश त्यांच्या ग्राहकांना फुलपाखरांच्या संवर्धनाविषयी मार्गदर्शन करतात.

निलेश म्हणाले, आम्ही नेहमी आमच्या ग्राहकांना त्यांच्या घरच्या बागांमध्ये फुलपाखरांच्या अळ्यांना मारू नका असे सांगतो. त्या हानिकारक नाहीत, आणि त्या आपल्या पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. आपल्या बागेत फुलपाखरे, पक्षी आणि कीटक असल्यास ती एक आनंदी आणि निरोगी बाग असल्याचे लक्षण आहे. नर्सरीने ब्लू मॉरमनच्या अनेक फोटों आणि व्हिडिओज कैद केले आहेत, ज्यामुळे निसर्गप्रेमी आणि संरक्षणकर्त्यांमध्ये उत्साह पसरला आहे. हे निरीक्षण दर्शवते की, शहराच्या गजबजाटातही अशा हिरव्या जागांमध्ये फुलपाखरांना फुलण्यास मदत होते, ज्यामुळे नागरी जैवविविधतेचे संवर्धन होण्यास मदत होते. एनप्लांट्स नर्सरी आपल्या शाश्वत पद्धतींचे उदाहरण निर्माण करत आहे, जिथे फुलपाखरांना त्यांच्या जीवनचक्राचे पूर्ण होण्यासाठी हानिकारक रसायनांपासून मुक्त वातावरण मिळते. प्रियंका आणि निलेश यांच्या या प्रयत्नांमुळे पुण्यातील नागरी जैवविविधतेच्या संवर्धनासाठी इतरांनाही प्रेरणा मिळेल अशी त्यांची आशा आहे.

## चार वर्षात ६४ हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला थकबाकी नसलेल्याचा दाखला कर संकलन विभागाची ऑनलाईन सेवा नागरिकांसाठी ठरतेय उपयुक्त!

प्रमाणावर उपयोग होत आहे. दरम्यान, महापालिकेने नागरिकांना विनंती केली आहे की त्यांनी मालमत्ता कराची थकबाकी वेळेत भरून ही ऑनलाइन सुविधा नियमितपणे वापरावी. ऑनलाईन दाखला मिळवण्याच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण आल्यास कर आकारणी विभागाशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आगामी काळात या प्रक्रियेत आणखी तांत्रिक सुधारणा करून ती अधिक वेगवान व सोपी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले.

## पुण्यात साकारले कॅमेऱ्यांचे अनोखे संग्रहालय

लोकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. समाजाच्या आणि व्यक्तींच्या आठवणींशी जोडले गेलेले हे कॅमेरे आता सर्वेश राजपाठक यांनी एका संग्रहालयात जतन केले आहेत. सुमारे दोन दशकांतील कॅमेऱ्यांचे तंत्रज्ञान आणि त्यातील बदल या संग्रहालयात पाहता येतील. पूर्वी केवळ राजपरिवारापुरता मर्यादित असलेला कॅमेरा आज लहान मुलांच्या हातातही आहे, हा प्रवास येथे अनुभवता येईल, असे सर्वेश यांनी सांगितले. हे संग्रहालय सिंहगड रस्त्यावरील पानमळा येथील सीता दुर्ग सोसायटीतील त्यांच्या बंगल्यात आहे.

सर्वेश राजपाठक यांच्याकडे सहाशेहून अधिक कॅमेऱ्यांचा संग्रह असून, सध्या दोनशेहून अधिक कॅमेरे संग्रहालयात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहेत. यातील काही कॅमेरे त्यांना भेट म्हणून मिळाले, तर काही त्यांनी स्वतः जमा केले. येथील बहुतांश कॅमेरे कार्यरत असून, अनेक कॅमेऱ्यांचे रिस्टोरेशन केले आहे. हे केवळ कॅमेऱ्यांचे संग्रहालय नाही, तर त्यामागील तंत्रज्ञान, माहिती आणि फोटोग्राफी उद्योगाचा उदय याची मांडणी येथे करण्यात आली आहे, असे सर्वेश यांनी नमूद केले. त्यांच्या वडिलांनी, सतीश राजपाठक यांनीही काही कॅमेरे संग्रहित केले असून, या संग्रहालयाच्या उभारणीत त्यांची मोलाची साथ लाभली आहे.

# आला पावसाळा डेंग्यूपासून स्वत:ला सांभाळा

जगामध्ये कोट्यवधी नागरिकांना डेंग्यू रोगाचा संसर्ग होतो. भारततही ग्रामीण, शहरी व दाट लोकवस्तीच्या भागात या रोगाचे प्रमाण अधिक आहे. या रोगा मध्ये मृत्यूदेखील होतात. या रोगाची साथ, उद्रेक पावसाळ्यात अधिक प्रमाणात होते. दरवर्षी सातत्याने डेंग्यू रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पावसाळ्यामध्ये नागरिकांनी अधिक काळजी घेण्याची गरज आहे.

डेंग्यू आजाराचा प्रसार: एडीस इजिप्ती नावाची मादी डास चावल्या मुळे या रोगाचा प्रसार होतो. हा रोग विषाणूजन्य आजार आहे. डेंग्यू विषाणुचे डेंग्यू-१, डेंग्यू-२. डेंग्यू-३ व डेंग्यू-४ असे चार प्रकार आहेत. डेंग्यू विषाणूयुक्त डास मरेपर्यंत दुषित राहून विविध व्यक्तींना चावून या रोगाचा प्रसार करतो. डासाच्या शरीरात डेंग्यू विषाणूची वाढ साधारणतः ८ ते १० दिवसांत पूर्ण होते. एडिस इजिप्ती डास साठविलेल्या स्वच्छ पाण्यात उदा. रांजण, माठ, कुलर्स, पाण्याचे हौद, घराच्या छतावरील टाकाऊ वस्तू, नारळाच्या करवंट्या, टायर आदीमध्ये पैदास होतात. या डासांच्या पायांवर काळे पांढरे रिंग असतात म्हणून या डासांना 'टायगर मॉस्क्युटो' सुध्दा म्हणतात. वाढ अंडी, अळी, कोष, डास या चार प्रकारामध्ये होते. त्यांचा अधिशयन कालावधी ३ ते १० दिवसांचा असतो.

डेंग्यू आजाराची लक्षणे: तीव्र ताप, डोकेदुखी, स्नायूदुखी, सांधेदुखी, उलट्या येणे, लागण झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून तीव्र डोळे दुखी, अशक्तपणा, भूक मंदावणे, ताप कमी जास्त होणे, अंगावर पुरळ येणे अशी लक्षणे आढळून येतात. रक्तस्त्रावयुक्त डेंग्यू ताप (डेंग्यू हिमोरेजिक फिवर) यामध्ये त्वचेखाली रक्तस्त्राव होणे, नाकातून रक्तस्त्राव होणे, रक्ताची उलटी होणे, रक्तमिश्रीत किंवा काळसर रंगाची शौचास होणे, पोट दुखणे याप्रमाणे लक्षणे आढळून येतात. रक्तस्त्रावयुक्त डेंग्युताप बहुतांशी १५ वर्षांखालील मुलांसोबत वयस्कर व्यक्तींनाही होऊ शकतो त्यामुळे काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

*ग्यू शॉक सिंड्रोम: डेंग्यूमध्ये जेव्हा रुग्ण बेशुद्ध होतो त्याला डेंग्यु शॉक सिंड्रोम असे म्हणतात. यामध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक असते.

रोग निदान: सूक्ष्मजीव शास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय किंवा सेंटीनल सेंटर, जिल्हा सामान्य रुग्णालय येथे रक्तजल तपासणी करून निश्चित रोगनिदान होते.



उपचार: या आजारावर निश्चित असे उपचार उपलब्ध नाहीत. वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्लयानुसार औषधे व विश्रांती घेणे आवश्यक आहे. अतिशय घाम येणे, वारंवार उलट्या होणे, जिभेला कोरड पडणे अशा परिस्थितीत ओ आर. एस. (मीठ साखर पाणी) द्रावणाचा वापर करावा.

दक्षताः टॅब ॲस्परीन, ब्रुफेन इ. औषधी देऊ नयेत, वैद्यकीय अधिकारी यांच्या देखरेखीखाली औषधोपचार घेणे रक्तस्त्रावयुक्त डेंग्यूताप (डेंग्यु हिमोरेजिक फिवर) व डेंग्यू शॉक सिंड्रोम या रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा परिषद आरोग्य विभाग व जिल्हा हिवताप कार्यालयाद्वारे करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना: प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे रक्तनमुने व रक्तजल नमुने घेऊन राष्ट्रीय विषाणू संस्था तपासणी करण्यात येते. यामध्ये आढळून आलेल्या बाधित रुग्णांचा शोध घेऊन त्यांना औषधोपचार करण्यात येतो व परिसरात प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते. डास अळी व डास नियंत्रण ही सर्वात महत्वाची कृती आहे ती प्रभावीपणे सर्वेक्षणाद्वारे करण्यात येते.

आरोग्य विभागामार्फत घरातील सांडपाण्याचे रिकामे न करता येणारे पाणीसाठ्यात ॲबेटींग केले जाते. जैविक उपाय योजनाअंतर्गत डासोत्पती स्थानात गप्पीमासे सोडण्यांत येतात. हे मासे डासांच्या अळ्या खातात. सर्व आरोग्य संस्थेत गप्पी मासे मोफत मिळतात. उद्रेकग्रस्त भागात धुर फवारणी केली जाते. आठवडयात ०-३-७ दिवसाच्या अंतराने धुरफवारणी केली जाते.

नागरिकांनो, काळजी घ्या: डेंग्यूचा डास हा सामान्य डासांपेक्षा वेगळा असतो आणि तो दिवसा चावतो. घरामध्ये आणि आजूबाजूला डासांची पैदास होऊ देऊ नका. कुलर मधील पाणी नियमित बदला. पावसाळ्यात कुंड्या बाटल्या किंवा इतर ठिकाणी पाणी साचू देऊ नका. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. व्हेंट पाईपला जाळी बसवून घ्यावी. कुंड्या, फुलदाण्यातील पाणी सतत बदला. गटारी नाले वाहते करा. घरातील बॅरल, भांडी हवाबंद झाकणाने / कापडाने झाकून ठेवा. पक्षांना गुरांना पिण्यासाठी ठेवलेले पाणी सतत बदला व ते भांडे आठवड्यातून एकदा स्वच्छ करावे. घराच्या गच्चीवर पाणी साठू देऊ नका. फ्रिजच्या मागील साठलेले पाण्याचे भांडे आठवड्यातून एकदा रिकामे करा, याप्रमाणे नागरिकांनी याप्रमाणे दक्षता घेतल्यास डासाची उत्पत्ती थांबविण्यास मोठी मदत होईल.

बबिता कमलापुरकर, सहसंचालक, आरोग्य सेवा: या आजाराविषयी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती होण्याच्यादृष्टीने हा आजार होऊच नये याकरीता नागरिकांनी आरोग्य विभागाच्यावतीने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. या आजारावर मात करण्याकरीता प्रतिबंधात्मक उपायोजनेचा भाग म्हणून योग्य काळजी घ्यावी. बाधित रुग्णांनी वेळीच जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करुन तात्काळ उपचार सुरु करुन घ्यावे. तसेच किटकजन्य आजारावर नियंत्रणय ठेवण्यासाठी सहकार्य करावे.

# पुण्यातील गणेशोत्सव सरावावर वाद : रात्री १०.३० नंतर ढोल-ताशांचा आवाज रहिवाशांसाठी डोकेदुखी




**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सव जवळ आला की शहरातील विविध ढोल-ताशा पथकांचा सराव सुरू होतो. पारंपरिक तालांनी उत्सवाचा माहोल रंगतो, पण याच तालांमुळे अनेकांना झोपेचा आणि आरोग्याचा त्रास होऊ लागला आहे. गेल्या आठवड्यात धनकवडी, सिंहगड रोड, कोथरूड, सातारा रोड आणि सहकारनगर परिसरातील रहिवाशांनी तक्रार केली की रात्री १०.३० नंतरही जोरदार सराव सुरू असतो. त्यामुळे विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

सिंहगड रोडवरील रहिवासी राहुल जैन म्हणाले, मला सकाळी ७ वाजता ऑफिसला जायचे असते. सराव रात्री उशिरापर्यंत झाला तर झोप अपुरी राहते. डीजेच्या आवाजाइतका त्रास नसला तरी हा वेळ खूप उशिराचा आहे.

निवृत्त बँक अधिकारी विलास देशपांडे (७२) यांनी सांगितले, गणेशोत्सव हा आमचा आवडता सण आहे. तरुणांचा उत्साहही आम्हाला आनंद देतो. पण रात्री बारा वाजेपर्यंत ढोल-ताशांचा गडगडाट सहन होत नाही. वयस्करांना विश्रांती आवश्यक असते आणि सततच्या आवाजामुळे मानसिक ताण निर्माण होतो. पथकांनी संध्याकाळी लवकर सराव करावा ही आमची अपेक्षा आहे. सातारा रोडवरील रहिवासी सुंदर कोल्हे यांनी आरोग्याच्या धोक्याची जाणीव करून दिली. धनकवडी वॉर्ड ऑफिसजवळील मोकळ्या मैदानात रोज रात्री ११ वाजेपर्यंत सराव चालतो. मी हृदयरोगी आहे आणि डॉक्टरांनी पुरेशी विश्रांती घ्यावी असा सल्ला दिला आहे. मात्र या गोंगाटामुळे आमचे आयुष्य धोक्यात आले आहे. महापालिकेने व संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा, असे ते म्हणाले.

सध्या गणेशोत्सवाचा उत्साह आणि नागरिकांचा त्रास यांच्यातील समतोल साधणे हेच प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

# दर १० मीटरला एक देशी झाड! हरित शहरासाठी महापालिकेचा उपक्रम

**पिंपरी । वार्ताहर**

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील प्रमुख रस्त्यांच्या दुतर्फा दर दहा मीटर अंतरावर देशी वृक्ष लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महापालिकेच्या क्षेत्रामध्ये काही भागात विकसित झालेल्या रस्त्यांवर दुतर्फा झाडे दिसून येत नव्हती. त्या अनुषंगाने पावसाळ्यात हा नाविन्यपूर्ण उपक्रम महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आला आहे.

निगडी प्राधिकरणाप्रमाणेच शहरातील इतर भागातील बीआरटी तसेच अन्य विकसित रस्त्यावर हिरवेगार वृक्ष असावेत, यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महापालिकेच्या हद्दीतील ज्या रस्त्यांवर हरित आच्छादनाचे प्रमाण कमी आहे, अशा रस्त्यांना वृक्षारोपण करताना प्राधान्य देण्यात येत आहे. या रस्त्यांवर पदपथ शेजारील जागांमध्ये दर दहा मीटर अंतरावर पर्यावरणदृष्ट्या फायदेशीर व स्थानिक हवामानाशी सुसंगत अशा देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात येत आहे.



याशिवाय रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सार्वजनिक मोकळ्या जागांवरदेखील वृक्षारोपण करण्यात येणार आहे. शहर हिरवेगार व निसर्गसंपन्न करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महापालिकेचा उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे.

रस्त्यांच्या दुतर्फा लावण्यात येणाऱ्या देशी प्रजातींच्या वृक्षांमध्ये कडुलिंब, ताम्हण, कदंब, वड, पिंपळ, आकाशनीम, बकुळ, अर्जुन, मोहगणी, सोनचाफा, पारिजात अशा वृक्षांचा समावेश आहे. लागवड केलेल्या वृक्षांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी त्यांना बांबू ट्री गार्ड तसेच आवश्यकतेनुसार लोखंडी ट्री गार्ड बसवण्यात आले आहेत. तसेच या वृक्षांच्या देखरेखीच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात आले आहे.



**महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली.**

# शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ; बाजारभाव नाही, त्यात साठवलेला कांदाही सडला!

**नानगाव । वार्ताहर**

कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने दौंड तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत आले आहेत. उत्पादन खर्चदेखील परत न मिळाल्याने शेतकर्यांच्या डोळ्यांत अश्रू तर वखारीत खराब होत असलेला कांदा पाहून हवालदिलपणा दिसून येत आहे. 'इकडे आड तर तिकडे विहीर' अशी कांदा उत्पादक शेतकर्यांची स्थिती झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दौंड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कांदा लागवड झाली. यामध्ये काही नवीन शेतकर्यांनीही चांगले उत्पन्न घेतले. मात्र एप्रिलमधील प्रखर उष्णता आणि मे महिन्यातील अवकाळी पावसामुळे कांदा साठवणुकीत गंभीर अडचणी निर्माण झाल्या. पावसामुळे वाळवणात ठेवलेला कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकर्यांनी वखारीत साठवणूक केली. पण, हवामानातील बदलामुळे आर्द्रता निर्माण होऊन कांदा सडण्यास सुरुवात झाली. अनेक शेतकर्यांनी या वर्षी लाखो रुपये खर्च करून नव्या वखारी उभारल्या, परंतु त्या वखारीतच कांदा खराब होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे गडगडलेले बाजारभाव, तर दुसरीकडे सडणारा कांदा- अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकरी सांगतात, 'तळहातावरील फोडाप्रमाणे जपलेले कांद्याचे पीक आमच्या डोळ्यांसमोर सडत आहे आणि बाजारात त्याला भावही मिळत नाही. उत्पादन खर्चदेखील निघत नसल्याने परिस्थिती बिकट झाली आहे.' कांदा खराब होत असल्याने शेतकरी लाखो रुपये खर्चून उभारलेल्या वखारीकडे हताशपणे पाहात आहेत. कांद्याला भाव नाही, उत्पादन खर्च निघत नाही, मग या वखारींचा खर्च कधी निघणार, असा प्रश्न शेतकर्यांसमोर उभा आहे.

# घरगुती वीज ग्राहकांनी ओलांडला १,००० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेचा टप्पा

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सूर्यघर मोफत वीज योजनेतील यशस्वी कामगिरी

**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने यशस्वी कामगिरी केली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला या योजनेच्या अंतर्गत घरगुती ग्राहकांच्या छतावरील सौर ऊर्जानिर्मिती क्षमतेने एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी वीज ग्राहकांचे, महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तसेच छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या पुरवठादारांचे अभिनंदन केले आहे. मा. पंतप्रधानांनी सुरू केलेल्या या योजनेचा घरगुती ग्राहकांना थेट लाभ असल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. महावितरण राज्यात या योजनेची अंमलबजावणी करत आहे. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू केलेल्या या योजनेत गेल्या दीड वर्षात छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या राज्यातील ग्राहकांची संख्या अडीच लाखापेक्षा अधिक झाली असून त्यांची एकत्रित क्षमता १,००० मेगावॅट अर्थात एक गिगावॅट झाली आहे. या ग्राहकांना केंद्र सरकारकडून १८७० कोटी रुपये अनुदान मंजूर झाले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र हे आघाडीचे राज्य ठरले आहे. योजनेच्या अंमलबजावणीत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डिकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्यदिनी देशभर सौर ऊर्जेच्या वापराबाबत जागृती करण्यात येणार असून त्याच वेळी राज्यातील वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जानिर्मितीच्या बाबतीत एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला आहे.

छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत राज्यात नागपूर जिल्ह्याने ४०,१५२ लाभार्थी ग्राहक आणि १५७ मेगावॅट क्षमतेसह प्रथम क्रमांक मिळविला आहे. नागपूर जिल्ह्यापाठोपाठ पुणे (१९,१९५ ग्राहक व ८९ मेगावॅट क्षमता), जळगाव (१८,८९२ ग्राहक व ७० मेगावॅट क्षमता), अमरावती (१५,२४५ ग्राहक व ६३ मेगावॅट क्षमता), छत्रपती संभाजीनगर (१६,६६४ ग्राहक, ५९ मेगावॅट क्षमता) व नाशिक (१५,४६८ ग्राहक, ५५ मेगावॅट क्षमता) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

**योजनेचा असा लाभ घ्या**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या लाभार्थ्यांनी राज्यात एक हजार मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला असून अन्य घरगुती वीज ग्राहकांनी आणि गृहनिर्माण संस्थांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले. योजनेचा लाभ घेण्यासाठी https://pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ग्राहक महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधू शकतात.

छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ग्राहकांना थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅटला साठ हजार रुपये तर तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये अनुदान मिळते.

गृहनिर्माण संस्थांनाही पाचशे किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. छतावर बसविलेल्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पातून पुढे २५ वर्षे वीजनिर्मिती होते. या वीजनिर्मितीमुळे ग्राहकाची घरगुती गरज पूर्ण होते व अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते.

# एरंडवणे येथे दहीहंडी २०२५ उत्सव जल्लोषात हर्षवर्धन फाउंडेशन कडून भव्य आयोजन



पुणे । प्रतिनिधी

हर्षवर्धन फाऊंडेशन आणि एकता मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शारदा सेंटर जवळ एरंडवणे येथे दहीहंडी -२०२५ उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. आयोजक सनी निम्हण, हर्षवर्धन फाऊंडेशनच्या संस्थापिका स्नेहल सनी निम्हण आणि उत्सवअध्यक्ष शिवम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा रंगला. या परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.गोविंदा आला रे च्या तालावर तरुणाई न्हाऊन गेली. सहा थरांची मानवी रचना करून गोविंदांनी थरारक क्षणात दहीहंडी फोडली आणि परिसरात ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष उसळला.या सोहळ्याची शोभा वाढवण्यासाठी 'गोल्डन गाइज' म्हणून ओळखले जाणारे सनी वाघचौरे, बंटी गुजर तसेच प्रिती सोनी, मराठी अभिनेत्री पूजा कातुर्डे, गौरी कुलकर्णी, विदिशा म्हसकर, मराठी सिने अभिनेता अक्षय टंकसाळ यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. एरंडवणे, कर्वेनगर मधील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून हा पारंपरिक उत्सव अविस्मरणीय केला. दहीहंडी उत्सव आयोजनाचे मंडळाचे हे पहिलेच वर्ष होते.



दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना अनुक्रमे डावीकडून समीर निकम, दत्ता श्रीखंडे, श्रीकांत वाघ, आणि प्रतिमा पडघन.



आझम शेख यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना अनुक्रमे डावीकडून सुलभा क्षीरसागर, राजकुमार गायकवाड, भारत डायग्नोस्टिक सेंटर



आझम शेख यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना अनुक्रमे डावीकडून दलित मित्र सुरेश पाटोळ, मंदार नाईक, अरुण जंगम, गणेश घायमुक्ते



आझम शेख यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना डावीकडून अनुक्रमे ज्योती व विल्सन चांदवळ, दलित मित्र बाळकृष्ण, ॲड. असुंता पारधे दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना, संजय गायकवाड सोमनाथ नजन यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना



शहानवाझ शेख सुधीर वाघमोडे यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना, महेश ढबाळे आझम शेख व सुधीर वाघमोडे यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना १. दीपक सावंत व प्रसाद हसबनीस कार्यक्रम पाहताना



श्री संजय गायकवाड, आझम शेख व दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना डावीकडून वैशाली खांदवे, सौ सावंत, दीपक सावंत, संजय गायकवाड, भानुदास खंदारे, श्री व सौ. वैशाली व भानुदास खांदरे सोमनाथ नजन यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना

# दुबईत मराठी उद्योजकांची जागतिक परिषद, तीन दिवस मार्गदर्शन



पुणे । प्रतिनिधी

परदेशातील नोकऱ्यांबरोबरच आता उद्योगविश्वातही मराठी म ाणसाचे पाउल पुढे पडावे मराठी उद्योजकाला व्यवसायासाठी जगभराची दारे उघडी व्हावीत, जगातील मराठी उद्योजक एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करावे अशा अनेक संकल्पनेतून सुरू असलेलेल्या ग्लोबल इंटरपीनर दुबई २०२५ चे उद्घाटन आज दुबईत मोठ्या उत्साहात आणी जगभरातील मराठी उद्योजकांच्या प्रचंड प्रतिसादात उद्घाटन समारंभ पार पडला. या परिषदेचे उद्घाटन भारत - दुबई, युनायटेड अरब इमि राती चे वाणिज्य दूत सतीशकुमार स्वान, अल अली ग्रुप ऑफ कंपनीचे कार्यकारी संचालक दुबईचे एच.ई.याकुब अल अली, जेष्ठ विचारवंत व लेखक संदीप वासलेकर, प्रतापराव पवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी उद्घाटन सत्रात मार्गदर्शन केले. सलग तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत जगभरातील विविध क्षेत्रातील यशस्वी उद्योजक आणी तद्द मार्गदर्शक या परिषदेस मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी नवउद्योजकांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. प्रास्ताविक मनोगत या परिषदेचे संयोजक व महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे उपाध्यक्ष सचिन इटकर, यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक यांचे स्वागत गर्जे मराठी चे आंनद गानू व पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कार्यकारी संचालक गिरीश देसाई यांनी केले.

भारत आणि दुबई संयुक्त अरब अमिरातीचे वाणिज्य दूत सतीशकुमार शिवन म्हणाले की, येत्या २०४७ पर्यंत भारताचा विकास दर सहा दशलक्ष डॉलर पर्यंत जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यामध्ये सर्व भारतीय उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. जेष्ठ उद्योजक व सकाळ समूहाचे प्रतापराव पवार यांनी मराठी उद्योजकांनी प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली आहे. परंतु मराठी उद्योजकांनी त्याला योग्य व्यवहाराची जोड देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी मराठी उद्योजकांच्या या नव्या संकल्पनेचे कौतुक केले. तसेच दुबई हे जगातील उद्योग जगताचे प्रवेशद्वार असून या संधीचा उद्योजकांना योग्य उपयोग करावा असे आवाहान केले. दुबईतील प्रसिद्ध उद्योजक व अल अली समूहाचे सर्वेसर्वा एच.इ.याकुब अल अली यांनी भारतीयांनी दुबईत आपला व्यवसाय वाढवावा आम्ही त्यांचे सदैव स्वागत करू आणि पूर्ण सहकार्य करण्यास उत्सुक असल्याचे सांगितले.

आध्यात्मिक गुरु स्वामी ब्रह्मविहारी यांनी उद्योजकांना व्यवसायाबरोबर नैतिकता किती गरजेची आहे याची महती सांगितली.

भारती विद्यापीठाचे सचिव व माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी आपल्या मनोगत्ता मध्ये युवक उद्योजकांनी नव्या संधी कशा निर्माण होतात त्याविषयी अधिक लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले. महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी महाराष्ट्र राज्य उद्योगांमध्ये अग्रेसर राहण्यासाठी शासन आपल्या सर्वांच्या पाठीशी कायम उभे राहील असा विश्वास व्यक्त केला .असेच नव नवे उपक्रम जगभर आयोजित करण्यात आले पाहिजे व सर्व उद्योजकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, प्रतापराव पवार, जेष्ठ विचारवंत तथा लेखक संदीप वासलेकर, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, 'गर्जे मराठी' चे संस्थापक अध्यक्ष आनंद गानू, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे (एमइडीसी) अध्यक्ष अतुल शिरोडकर, पिंपरी-चिंचवड ट्रस्टच्या उपाध्यक्षा पद्मजा भोसले, गिरीश देसाई, कार्यक्रमाचे संयोजक सचिन इटकर यांसह देशातील आणि परदेशातील विविध क्षेत्रातील प्रमुख उद्योजक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात अमली पदार्थाविषयी जनजागृती

पुणे । प्रतिनिधी

भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे आणि पुणे गुन्हे शाखा - एन.डी.पी.एस. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी दि . १४ ऑगस्ट २०२५ रोजी अमली पदार्थांविषयी विशेष जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या धोक्याविषयी, एन.डी.पी.एस. कायद्याबद्दल माहिती देणे तसेच तरुणांमधील व्यसनाधीनतेच्या धोक्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. पोलीस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे,युद्धजीत भोसले,सौ. मोहिनी भोसले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश प्रसाद, उपप्राचार्य (प्रशासन) डॉ. सचिन चव्हाण, उपप्राचार्य (संशोधन व मानांकन) डॉ. सुनीता जाधव तसेच विभाग प्रमुख डॉ. एस. डी. जाधव उपस्थित होते.



या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक प्रशांत अण्णछत्रे यांनी एन.डी.पी.एस. कायद्याचे महत्त्व, त्याची अंमलबजावणी आणि अंमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याविरोधात चालवण्यात येणाऱ्या लढ्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तरुणाई अमली पदार्थांच्या आहारी जाण्याची वाढती प्रवृत्ती लक्षात घेता जनजागृती व प्रतिबंधात्मक उपायांची तातडीची गरज त्यांनी अधोरेखित केली. कार्यक्रमादरम्यान पोलीस उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रश्नोत्तर सत्र घेतले. अलीकडील घडामोडी, कायदेशीर प्रक्रिया आणि एन.डी.पी.एस. कायद्याशी संबंधित विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन त्यांनी केले. युद्धजीत भोसले यांनी वास्तव जीवनातील उदाहरणे देत सोप्या भाषेत एन.डी.पी.एस. कायद्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कायद्याचे , शिक्षेचे प्रकार आणि त्याचे परिणाम समजावून सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त केले. आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा मुद्दा मांडताना सौ. मोहिनी भोसले यांनी व्यसनाधीनतेमुळे होणारे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम उलगडून दाखवले. व्यसनाधीनतेपासून लांब राहण्यासाठी लवकर जागरूकतेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.